दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.११ डिसेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १०९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thruday 11 December 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 109 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मुख्यमंत्री आपल्या लाडक्या आमदारावर संतापले

# लाडकी बहिणीचा संबंध जोडण्यावर दिला घरी बसावे लागण्याचा इशारा

**नागपूर (वृत्तसंस्था)-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत प्रत्येक गोष्टीशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा संबंध जोणाऱ्या भाजपच्या एका आमदारावर चांगलेच संतापले. प्रत्येक गोष्टी लाडकी बहीण आणू नका. लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका, अन्यथा घरी बसावे लागेल, असे ते म्हणाले.त्याचे झाले असे की, भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी आज सभागृहात अवैध दारू विक्रीचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, अवैध दारू विक्रीवर मी मागील सरकारमध्ये एक आणि आता एक लक्षवेधी मांडली. आपल्या दालनामध्येही तीन बैठका झाल्या. पण त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही. हा ग्रामीण भागातील प्रत्येक आमदाराचा विषय आहे. त्यांना रोज काय त्रास होतो? हे त्यांना विचारा. लाडक्या बहिणींवर आपण नेहमी बोलतो. पण लाडक्या बहिणींचे दु:ख काय असेल, तर अवैध दारू विक्रीवर आळा घालावा हे आहे.**



## अभिमन्यू पवारांचे गृह खात्याकडे बोट

**पवार पुढे म्हणाले, या प्रकरणी कायद्यात योग्य ती दुरुस्ती करण्याची गरज आहे. या प्रकरणी विधानसभा अध्यक्षंनी बैठक घेतली. आपण उत्पादन शुल्क, गृह विभाग तथा अन्न व औषध प्रशासन विभागालाही निर्देश दिले. अध्यक्षांनी निर्देश दिल्यानंतरही काही कारवाई होत नसेल तर हा चिंतेचा विषय आहे, असे अभिमन्यू पवार म्हणाले. या माध्यमातून त्यांनी अप्रत्यक्षपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील गृह खात्याकडे बोट दाखवले.**




अभिमन्यू पवार यांच्या या विधानावर मुख्यमंत्री चांगलेच संतापले. ते संतापाच्या सूरात म्हणाले, मी सदस्यांना पुन्हा सांगतो. प्रत्येक गोष्टीत लाडकी बहीण आणू नका. लाडक्या बहिणींच्या विरोधात जाऊ नका. अन्यथा आपल्याला घरी बसावे लागेल. प्रत्येक गोष्टीत लाडकी बहीण - लाडकी बहीण करणे योग्य नाही. लाडक्या बहिणींचे पैसे चालूच राहतील. ती योजना सुरूच राहील. त्या योजनेची दुसऱ्या योजनांशी तुलना करता येत नाही, असे ते म्हणाले.तत्पूर्वी, काँग्रेस आमदार ज्योती गायकवाड यांनी फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या मृत्यू प्रकरणावर सभागृहात बोलताना लाडकी बहीण योजनेचा उल्लेक केला होता. लाडक्या बहिणींना १५०० रुपये नको, सुरक्षा द्या, असा सूर त्यांनी आळवला होता. त्यावरही फडणवीसांनी कोणत्याही गोष्टी लाडकी बहीण योजनेला जोडू नका, असा सल्ला दिला. त्यानंतर काही मिनिटांतच अभिमन्यू पवार यांनी लाडकी बहीण योजनेचा उल्लेख केल्याने फडणवीसांचा पारा चढला.

## गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती सर्व शासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी-नवनाथ शिराळे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची प्रती वर्षे प्रमाणे १२ डिसेंबर रोजी जयंती आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शासकीय कार्यालय व शासनाच्या अंतर्गत येणारे महामंडळे,अंगीकृत उपक्रम या ठिकाणी त्यांची जयंती शासन आदेशान्वये साजरी करण्यात यावी. जेणेकरून देशाच्या व राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या कार्यालयीन कार्यामध्ये त्यांचा फार मोठा सहभाग होता. त्यांचे कार्य अतुलनीय आहे.आजही तळागाळातला वंचित बहुजन सर्व समाज घटकाला न्याय देणारे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा उल्लेख कायम करावा लागेल. त्यांच्या जयंती निमित्त देशात व राज्यात विविध ठिकाणी वेगवेगळे उपक्रम



राबवले जातात.कोणी वैयक्तिक पातळीवर तर सार्वजनिक स्तरावर कार्यक्रम, उपक्रम राबवितात. १९९५ ला युती सरकार सत्तेत आल्यानंतर स्व. मुंडे साहेबांनी विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून राज्यांमध्ये मोठमोठ्या प्रमाणावर विकासात्मक कामे केली. जन हिताचे निर्णय घेतले. शेतकऱ्यांचे,ऊसतोड कामगारांचे, युवकांचे, महिलांचे नेमके प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी नेहमी प्रयत्न केले.त्याच काळामध्ये राज्यात ऊर्जाची टंचाई निर्माण झाली, अशावेळी त्यांनी काही धाडसी निर्णय घेऊन मोठमोठे प्रकल्प उभी केली. त्यामुळे राज्याच्या औद्योगिक विकास झाला. उपक्रम,निर्णय जे की, स्व. मुंडे साहेबांनी हाती घेतले. त्यामुळे राज्य सरकारने १२ डिसेंबर रोजी सर्व शासकीय कार्यालय,महामंडळे, अंगीकृत उपक्रम या ठिकाणी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांची जयंती साजरी करण्यात यावी.अशी मागणी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे भाजपा बीड जिल्ह्याचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील मा. नं. प. सभापती तथा लोकशाही पत्रकार संघांचे प्रदेश उपाध्यक्ष यांनी केली आहे.

## परळीच्या पक्षपाती निवडणूक अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार-दीपक नाना देशमुख

### कोर्टाने निवडणूक अधिकाऱ्यांचे पाच पैकी चार निर्णय फेटाळले आणि एक प्रकरण उच्च न्यायालयात सुरू

दैनिक वादळ वार्ता

**परळी (प्रतिनिधी)**

एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे माजी नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे उमेदवार दीपक नाना देशमुख यांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या पक्षपाती भूमिकेबाबत गंभीर मुद्दे जनतेसमोर मांडले आहेत. सध्या सुरू असलेल्या येथील नगर परिषद निवडणुकीत अधिकाऱ्यांनी घेतलेली जगजाहीर पक्षपाती भूमिका सर्व राज्य बघत आहे. अर्ज छाननी प्रक्रियेत निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर, व्यंकटेश मुंडे, त्र्यंबक कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयां विरोधात आमचे सहकारी कोर्टात गेले होते. कोर्टाने निवडणूक अधिकाऱ्यांचे पाच पैकी चार निर्णय फेटाळले



आणि एक प्रकरण उच्च न्यायालयात सुरू आहे. या सर्व जागांची निवडणूक सध्याच्या निवडणूक कार्यक्रमानुसार २० डिसेंबर रोजी होणार आहे. दिवसाढवळ्या निवडणूक अधिकाऱ्यांचे प्रताप जनता बघत आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक नाना देशमुख यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करूनही दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही.त्यामुळे येऊ घातलेल्या पाच जागांच्या निवडणुका आणि मतमोजणीत मोठी हेराफेरी होऊ शकते. लोकशाहीच्या रक्षणासाठी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र सरकारने व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांनी येथील पक्षपाती निवडणूक अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करून सक्षम व कर्तव्यदक्ष अधिकारी नेमावेत अशी मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दीपक नाना देशमुख यांनी केली आहे.

## एसटी महामंडळाला ५० हजारांचा चुना; परळी आगारातील वाहक फरार

दैनिक वादळ वार्ता

**परळी (प्रतिनिधी)**

एसटी महामंडळाच्या परळी आगारात खळबळ उडवणारा प्रकार उघडकीस आला असून, कर्तव्यावर असताना जमा झालेली तिकिटांची रक्कम आणि ईटीएम मशीनसह वाहक गायब झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित वाहकाविरुद्ध परळीत संभाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परळी आगारातील व्यवस्थापनात एकच खळबळ उडाली असून, एसटी महामंडळाच्या आर्थिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याबाबत पोलिस सूत्राकडून प्राप्त माहिती अशी की, परळी आगारातील वाहक बालासाहेब तुळशीराम हाडबे हा २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० ते २४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० या कालावधीत परळी-लातूर-वाघाळा-अंबाजोगाई अशा विविध फेऱ्यांवर कार्यरत होता. या दरम्यान जमा झालेली सुमारे १० हजार रुपयांची तिकिटांची रक्कम आणि सुमारे ४० हजार रुपये किमतीचे ईटीएम मशीन आगारात जमा न करता तो बेपत्ता झाला आहे. विशेष म्हणजे गेल्या ८ ते १० दिवसांपासून तो गैरहजर असल्याचेही समोर आले. या प्रकरणी परळी आगाराचे वाहतूक निरीक्षक कपील शिवचरण चिंदालिया यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वाहकाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एस. एम. चव्हाण करीत आहेत.

## द इंडियन रोड काँग्रेस मानकांविरुद्ध असणारे केज बीड रोडवरील गतिरोधक तात्काळ हटवावेत-डॉ.अजय कदम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

रस्त्यावरील वाहने ही खूपच वेगाने धावत आहेत.काही तरुण, महिला बेदरकारपणे वाहने चालवत आहेत. काही चालक नशेच्या अधीन राहून वाहन चालवतात.या आणि अशा अनेक कारणांमुळे रस्त्यावर अपघात होत आहेत.मानवी जीवन अमूल्य आहे.रस्त्यावर अपघात होतो ते दृश्य आणि मिळणारी मदत पाहिल्यावर कठोरातल्या कठोर मनुष्याचे हृदय पिळवटून जाते आणि मुखातून एक वाक्य बाहेर पडते इथे गतिरोधक हवाच यात गैर ते काय ? सामान्य माणसाचा जीव आणि कुण्या महान नेत्याचा जीव सर्वत्र सारखाच असतो.तरीही, गतिरोधक उभारणी केल्यावर हे अपघात होणार नाहीत याची हमी देता येत नाही.गतिरोधक उभारणीचे काही नियम आहेत.कुणीही उठसुठ हे गतिरोधक उभारणी करू शकत नाही.ढहश खपवळरप ोरव उेपसीशीी ही संस्था १९९६ साली स्थापन झाली असून, संस्थेने यासंबधीची नियमावली तयार केली आहे.या नियमांना वगळून आपण हवे तेव्हा आणि वाटेल तिथे गतिरोधक उभारू शकत नाही.या संबधी दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय फार महत्वाचा वाटतो.दि.३० मे २०१६ रोजी 'द हिंदू' या दैनिकात आलेली बातमी यावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे.कुमार यांनी दाखल केलेल्या याचिकेत निर्णय देतेवेळी न्यायमूर्ती बी.डी. अहमद व न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांनी The Indian road Congress aani Unified Traffic and Transportation center यांनी निर्धारित केलेल्या मानकांच्या विरुद्ध असलेले सर्व गतिरोधक चार आठवड्यात काढून टाकण्यात यावेतअसा आदेश दिला.याचा अर्थ असा की,राष्ट्रीय महामार्गा वर गतीरोधक उभारता येणार नाहीत.ते राज्य मार्गावर,चौकात,शहरी भागात,शाळा,दवाखाने अशा ठिकाणी उभारता येतात.मात्रते महामार्गावर उभारता येत नाहीत.उंची चार इंच असावी.४० मीटर अगोदर काळ्या - पांढऱ्या रंगाच्या चमकदार प्रवर्तित खुणा असाव्यात. राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी हा तळेगाव दाभाडे ते अहमदपूर ३९२ किमी. लांबीचा




आहे.या अंतरा मध्ये येणाऱ्या रस्त्यावर वस्त्या,गांवे,खेडे,शाळा, महाविद्यालये,दवाखाने, कडेलाच बाजारपेठा आहेत.यामुळे साहजिकच रस्त्याच्या कडेला मनुष्यांची रहदारी होते. अगदी रस्त्याच्या कडेला आपली वाहने उभी केली जातात.दुकानाच्या पाट्या लावल्या जातात.नाल्या खोदल्या जातात. रस्त्याच्या शेजारी काही पेठांमध्ये तर आठवडी बाजार भरतो.रस्त्याच्या कडेला काही दादा लोक आपली वाहने उभी करतात त्यामुळे कितीतरी तास वाहतूक कोंडी होते. प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. कधीकधी अपघात होतात आणि या सर्वांचा राग निघतो तो निर्जीव रस्त्यावर.तो बिचारा काही प्रतिक्रया देत नाही. यामुळेच की काय आपण वाटेल तिथे गतिरोधक उभारतो.हे नव्याने उभारलेले गतिरोधक स्थानिकांना थोडाफार दिलासा देतात.हे कार्य ज्यांनी केले त्यांनाही दैनिकात स्थान मिळते. मात्र,अपघाताचा प्रश्न कायमचा संपला असे कोणीच सांगू शकत नाही. मराठीत एक म्हण आहे दुखणे हल्याला असते आणि इंजेक्शन आपण पखालीला देतो यांनी याचेही कौतुक होते ही आश्चर्याची बाब हल्ली घडताना दिसत आहे.या सर्व बाबींचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की सरकारी यंत्रणा आणि बेशिस्त नागरिक यांच्या मुळे हे अपघात होत आहेत.यासंबधी या सरकारी यंत्रणांना प्रश्न विचारायचे सोडून आपण निर्जीव रस्त्यावर अन्याय करतो.वाटेल तिथे रोड फोडणे,कडेला जनावरे बांधणे,गतिरोधक उभारणे खरोखरच थांबविले पाहिजे.अशा आशयाचे निवेदन डॉ.अजय कदम तालुका प्रवक्ता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प),व अक्षय मुजमुले यांनी दिले आहे.

संपादकीय

# विकासाचे महामार्ग

देशात रस्ते विकासाला गती देण्यात आली आहे. एकाच दिवशी जास्त किलोमीटर रस्त्याचे काम करण्याचा विक्रम नोंदवला गेला आहे. आता तर एक लाख दहा हजार कोटी रुपये खर्चून अनेक महत्त्वाचे रस्ते तयार केले जात आहेत. त्यात सरकारी–खासगी भागीदारीतून केलेल्या रस्त्यांचाही समावेश आहे. चांगले रस्ते गतिमान विकासाचे चिन्ह असून सरकारने रस्ते विकासाचा महामार्ग तयार केला आहे, त्यानिमित्ताने.भारतात गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र शासनाच्या समग्र आणि एकात्मिक दृष्टिकोनामुळे पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास झाला आहे. धोरणांमध्ये सुधारणा व युद्धपातळीवर राबविले जाणारे प्रकल्प यांच्या भक्कम पायाभरणीवर आधारित या परिवर्तनामुळे दळणवळण सुविधांचा विस्तार तर झालाच; शिवाय आर्थिक उत्पादकता वाढली. मालवाहतूक आणि साठवणुकीचा खर्च कमी झाला आणि पुरवठा सेवाही सुधारली. प्रगती, पीएम गतीशक्ती, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण, भारतमाला, सागरमाला आणि उडान अशा प्रमुख राष्ट्रीय प्रकल्पांनी एकत्रितरीत्या संपर्क सुलभतेमुळे भारत जागतिक स्पर्धेला तयार झाला आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या उद्दिष्टाला अनुसरूनच हे रूपांतरण घडते आहे. ‘प्रगती’ उपक्रमांतर्गत आतापर्यंत ३६३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. प्रगती उपक्रमाद्वारे पंतप्रधान केंद्र सरकारचे सचिव, राज्यांचे मुख्य सचिव यांच्यासोबत दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधतात. यामध्ये अत्याधुनिक डिजिटल डाटा व्यवस्थापन आणि भूस्थानिक तंत्रज्ञानाची मदत होते. पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सक्रिय प्रशासन आणि वेळेत अंमलबजावणीची संस्कृती रुजवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या तक्रारींची वेळोवेळी दखल घेऊन सरकारी योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीद्वारे हमी आणि निरनिराळ्या आंतर मंत्रालयीन किंवा संघराज्यीय समस्यांमुळे आधी रखडलेले महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामकाजाची गती वाढवणे याद्वारे उद्दिष्ट साध्य करण्यात येत आहे.भारताच्या आर्थिक क्षेत्रांमधील बहुआयामी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी ‘पीएम गतीशक्ती’ राष्ट्रीय बृहद् आराखडा उपक्रम १३ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू करण्यात आला. या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे शंभर कोटी रुपयांचा निधी कार्यक्षमरीत्या वापरला जात आहे. रेल्वे, रस्ते, बंदरे, जलमार्ग, विमानतळ, अवजड वाहतूक आणि लॉजिस्टिक्ससंबंधी पायाभूत सुविधा या सात महत्त्वाच्या क्षेत्रांवर आधारित हा उपक्रम मंत्रालये व राज्य सरकारांच्या माध्यमातून विकासाला चालना देत आहे. ‘बिसाग–एन’ (भास्कराचार्य अंतरिक्ष उपयोजन व भूमाहितीशास्त्र संस्था) संस्थेने विकसित केलेल्या जीआयएस प्रणालीचा उपयोग करून २०० डेटा मंचांवर प्रकल्पाचा वस्तुस्थिती निदर्शक नकाशा व समग्र माहिती या आराखड्याद्वारे उपलब्ध करून दिली जाते. ‘पीएम गतीशक्ती’ उपक्रमाच्या तत्त्वांनुसार विविध मंत्रालयांच्या १५.३९ लाख कोटी रुपये खर्चाच्या २०८ मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यांकन केले गेले आहे. प्रकल्पांशी संबंधित विविध घटकांना प्रकल्पाची वेळेत माहिती मिळाल्यामुळे आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यातही पीएम गतीशक्ती प्रकल्पाची मदत होईल. प्रकल्पाचे वेगवेगळ्या ठिकाणी निरनिराळ्या दृष्टिकोनातून आरेखन आणि नियोजन होण्याऐवजी आता एका समान दृष्टिकोनातून आरेखन आणि अंमलबजावणी होईल. विविध मंत्रालये आणि राज्य सरकारांच्या भारतमाला, सागरमाला, जलमार्ग, बंदरे, उडान यांसारख्या पायाभूत सुविधा योजना यामुळे एकत्रित होतील.वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक, मत्स्य व्यवसाय, कृषी इत्यादी आर्थिक क्षेत्रांमधली दळणवळणाची सुविधा सुधारल्यामुळे भारतीय उद्योग जागतिक स्पर्धेचा सामना करण्यास सज्ज असतील. यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. विदेशी गुंतवणूक वाढेल आणि जगातले भारताचे स्थान उंचावेल. राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण एकात्मिक, कार्यक्षम आणि वाजवी खर्चाच्या लॉजिस्टिक सुविधांचे जाळे निर्माण करून भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी १७ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी करणे, २०३० पर्यंत लॉजिस्टिक्स कार्यक्षमता निर्देशांका(एलपीआय)मध्ये जगातील पहिल्या २५ देशांमध्ये स्थान मिळवणे आणि माहिती आधारित निर्णयांना प्रोत्साहन देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. लॉजिस्टिक्सवरील सध्याचा १३–१४ टक्के खर्च कमी करुन तो इतर विकसित देशांमधील खर्चाच्या बरोबरीने आणण्याचे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यामुळे भारतीय उत्पादनांची भारतासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढेल. तसेच कमी झालेल्या खर्चामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमधील कार्यक्षमता वाढीस लागेल, परिणामी मूल्यवृद्धी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळेल.या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा (एनएचएआय)ने चालू आर्थिक वर्षात ५२ महामार्ग प्रकल्पांसाठी निविदा मागवल्या आहेत. त्यांची एकूण लांबी २,१८८ किलोमीटर असून सर्व प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी १.१५ लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च आवश्यक आहे. त्यामुळे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय २०२५–२६ मध्ये दहा हजार किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग बांधण्याचे उद्दिष्ट जलदगतीने पूर्ण करण्यास मदत करू शकते. या ५२ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे, १५ प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले असून लवकरच मंजुरी देण्यात येईल, सहा प्रकल्प मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे पाठवण्यात आले आहेत, दहा प्रकल्प स्थायी वित्त समितीकडे (एसएफसी) मूल्यांकनासाठी पाठवण्यात आले आहेत आणि तीन प्रकल्पांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यासाठी तयार आहे. ‘एनएचएआय’ने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४,५०० किलोमीटर रस्ते देण्याचे आणि पाच हजार किलोमीटर रस्ते बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आतापर्यंत ५०४.३२ किलोमीटर लांबीचे ४३ प्रकल्प मंजूर केले आहेत आणि २,०६०.९९ किलोमीटरचे काम पूर्ण केले आहे. पहिल्या सहामाहीमध्ये सुरुवात मंद असली, तरी मंत्रालय निश्चितच वर्षासाठी निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करेल. सप्टेंबरच्या अखेरीस, गेल्या वर्षी याच कालावधीत ३,८०० किलोमीटरच्या तुलनेत तीन हजार दोनशे किलोमीटर रस्ते पूर्ण करण्यात आले होते.चालू आर्थिक वर्षातील पहिल्या महामार्ग मुद्रीकरणाच्या प्रकरणात ‘आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर टोल ऑपरेट ट्रान्सफर’ (टीओटी) मोडद्वारे मुद्रीकरण केलेल्या ऑपरेशनल मालमत्तेसाठी सर्वाधिक बोली लावणारी कंपनी म्हणून उदयास आली आहे. कंपनीने उत्तर प्रदेशमधील ३३३.४ किलोमीटर महामार्ग नेटवर्कसाठी ९,२०० कोटी रुपयांच्या ऑफरसह बोली जिंकली. ही कंपनी उच्च महसूल क्षमता असलेल्या महामार्गांमध्ये गुंतवणूक करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने चालू आर्थिक वर्षासाठीचे त्यांचे मुद्रीकरणाचे लक्ष्य वाढवून ४० हजार कोटी रुपये केले आहे. त्याचा उल्लेख केंद्रीय अर्थसंकल्पात होता. २०२४–२५ मध्ये महामार्ग निर्मात्याने मुद्रीकरणाद्वारे २८,७२४ कोटी रुपये उभारले होते. या वर्षाच्या एकूण उद्दिष्टापैकी १५ हजार कोटी रुपये ‘टीओटी’ आणि ‘इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ‘(आयआयटी) मार्गांद्वारे येतील आणि उर्वरित प्रकल्पआधारित वित्तपुरवठ्यातून येतील. ‘टीओटी’अंतर्गत सर्वात जास्त बोली लावणाऱ्या आणि तांत्रिक निकष पूर्ण करणाऱ्याला ज्या महामार्गांसाठी सवलत मिळाली आहे, त्यावर टोल वसूल करण्याचा अधिकार मिळतो. सवलतीचा कालावधी २० वर्षांचा असतो. त्यानंतर मालमत्ता ‘एनएचएआय’कडे परत येते. मालमत्तेच्या मुद्रीकरणाच्या पावत्या भांडवली खर्चासाठी ‘एनएचएआय’कडे परत पाठवल्या जातात. सध्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या एकूण अर्थसंकल्पीय संसाधनांपैकी दहा टक्के मुद्रीकरण पूर्ण करत आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे पायाभूत सुविधा गुंतवणूक ट्रस्ट मार्गाच्या पाचव्या फेरीसाठी मुद्रीकरणाची बोली प्रक्रिया लवकरच सुरू होईल. इतर प्रमुख गुंतवणूकदार आणि तपशील सरकारकडून तयार केले जात आहेत. पुढील काही आठवड्यांमध्ये सुरू होणाऱ्या पाचव्या फेरीत ‘एनएचएआय’ने एकूण ५५० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे नऊ रस्ते मुद्रीकरणासाठी निवडले आहेत. हे रस्ते महाराष्ट्र, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील आहेत. या वर्षी महामार्ग मुद्रीकरणाद्वारे निधी उभारणीसाठी ४० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाशिवाय राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांचे बांधकाम विभाग आदी माध्यमांमधूनही देशात रस्ते बांधणीला चालना दिली जात आहे. त्यात पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून गावा–गावांपर्यंत चांगले रस्ते तयार होत आहेत. पाणंद रस्त्यांच्या माध्यमातून थेट बांधावर पोहोचण्याची व्यवस्था होत आहे.

# लिंबागणेश परीसरात बिबट्याचा संचार!

## कृषी पंपासाठी दिवसा विद्युत पुरवठ्याची मागणी मान्य–राजेंद्र मस्के

## लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा उद्याचा रास्तारोको आंदोलन स्थगित–डॉ.गणेश ढवळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आज सकाळी महावितरण उपकेंद्र लिंबागणेश येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पुढाकारातुन सहाय्यक अभियंता महेश गायकवाड यांच्याशी डॉ. गणेश ढवळे, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यां सोबत चर्चा झाली. ग्रामस्थांची अडचण समजून घेत त्यांनी कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा देण्यास मान्यता दिली.अशी माहिती राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. या निर्णयामुळे लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून उद्याचा रस्ता रोको आंदोलन स्थगित केले आहे. असे समाजसेवक डॉक्टर गणेश ढवळे यांनी सांगितले आहे.

लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने पिंपरनई, पोखरी (घाट), बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी,मोरगाव–फुकेवाडीकाळेवाडी, गणेशनगर अशा पंचक्रोशीतील गावांमध्ये ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकऱ्यांना रात्री कृषी पंप सुरू असताना पिकांना



पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जाण्याचा धोका वाढत होता. बिबट्याचा वावर लक्षात घेता त्यांच्या जीवितास गंभीर संकट निर्माण होत असल्यामुळे कृषी पंपासाठी दिवसा नियमित वीजपुरवठ्याची मागणी जोर धरत होती. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उद्या (दि.११) लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला होता.

**अभियंत्यांसोबत चर्चेला सकारात्मक प्रतिसाद – मागणी मान्य**

कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा देण्यास मान्यता दिली.यामुळे उद्या होणारे रास्तारोको आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

या चर्चेला आणि मागणीसाठी पुढाकार घेण्यात राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार गट) यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी पंपांना दिवसा वीजपुरवठा करण्याबाबत त्यांनी सहाय्यक अभियंता, उपकेंद्र लिंबागणेश आणि उपकार्यकारी अभियंता, बीड ग्रामीण विभाग यांना पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा केला आहे.

या बैठकीत बालासाहेब जाधव (सरपंच), राजेभाऊ आप्पा गिरे (माजी पंचायत समिती सदस्य), कल्याण वाणी (माजी सरपंच), रविंद्र निर्मळ (चेअरमन, सेवा सोसायटी), पत्रकार हरिओम क्षीरसागर, दामोदर थोरात, मोहन कोटुळे, बिभीषण मुळीक (सरपंच, पोखरी), बाळासाहेब वायभट (सरपंच, पिंपरनई), शहादेव कोल्हे, पांडुरंग वाणी, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, सर्पमित्र अशोक जाधव, संतोष वाणी, संजय सुकाळे, तुकाराम गायकवाड, अंबादास ढास, अजित मंडलिक, बिभीषण वाणी, घाडगे गणेश, मुळे जीवन, सचिन गिरे, आरूण निर्मळ, रामदास मुळे, बंकट लगास, विलास वायभट, अभिमान वाणी, कृष्णा वायभट, रविंद्र ढास यांचा समावेश होता.

# पिंपळवाडी सबस्टेशन 5 MVA क्षमतेचा ट्रांसफार्मरला मान्यता–राजेंद्र मस्के

## शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पिंपळवाडी सबस्टेशन अंतर्गत गावांना अंतर्गत गावांना दिवसा कृषी पंपा साठी लाईट मिळणार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळवाडी स्टेशन करिता 5 MVA क्षमतेचा नवीन ट्रांसफार्मरला मान्यता मिळाली असून लवकरच हे काम पूर्ण केले जाईल. या ट्रांसफार्मर मुळे पिंपळवाडी सबस्टेशनची क्षमता दुप्पटीने वाढणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. तसेच सूर्याचीवाडी भाळवणी, देवऱ्याचीची वाडी आधी परिसरात दोन दिवसात होणारा विद्युत पुरवठा रद्द करून दिवसात दोन टप्प्यांत विद्युत पुरवठा केला जाणार आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष माननीय राजेंद्र मस्के यांनी, अधीक्षक अभियंता महाराष्ट्र विद्युत कंपनी बीड



यांची भेट घेतली. सूर्याचीवाडी ग्रामस्थासह भेट घेऊन मागण्यांची निवेदन दिले. सूर्याचीवाडी, देवऱ्याचीवाडी भाळवणी, मांडवजाळी मंजरी, आदमानेवस्ती वायकर वस्ती या गावांना दोन दिवसाआड विद्युत पुरवठा करण्याऐवजी एक दिवसात दोन टप्पे करून खालील गावांना दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा. या मागणी केली .

या मागणीला मान्यता मिळाली आहे.पिंपळवाडी स्टेशनवर क्षमतेपेक्षा जास्त विद्युत लोड वाढल्याने आवश्यक त्या प्रमाणात विद्युत पुरवठा होत नाही. शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना सुरळीत वीजपुरवठा होत नाही. या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत होऊन शेतकऱ्यांच्या मुबलक विद्युत पुरवठा व्हावा यासाठी पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुल कामाबरोबर पिंपळवाडी ३३ केव्हीसब स्टेशनची क्षमता वाढवण्यासाठी नवीन ट्रांसफार्मर करिता पाठपुरावा केला होता. ट्रांसफार्मर ला मान्यता मिळाली असून तेथे काही दिवसात हे काम पूर्ण होईल. व पिंपळवाडी सब स्टेशन वरील सर्व विद्युत ग्राहकांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा होईल.

# किरकोळ वादातून तरुणावर खुनी हल्ला करणाऱ्या दोघांना ७ वर्षांचा सश्रम कारावास

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

किरकोळ कारणावरून एका तरुणावर दगडाने गंभीर हल्ला करून त्याला दुखापत केल्याप्रकरणी नंदुरबार येथील मा. न्यायालयाने दोन आरोपींना ७ वर्षांचा सश्रम कारावास आणि प्रत्येकी ५,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

ही घटना उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धानोरा गावात दि. १३/०८/२०२२ रोजी घडली होती. धानोरा येथील रहिवासी अनिल नरपत वळवी याला त्याचे ओळखीचे आरोपी हरीष नेहरु वळवी आणि दिनेश केशवंत वसावे (दोन्ही रा. शांतीनगर, धानोरा) यांनी मोटारसायकल चालवण्याच्या वादातून मारहाण करण्यास सुरुवात केली.

मारहाण सुरू असताना, आरोपी हरीष वळवी याने हातातील दगडाने, तर आरोपी दिनेश वसावे यानेही अनिलच्या डोक्यावर गंभीर वार केले. गावातील लोकांनी फिर्यादी लताबाई वळवी (अनिलची आई) आणि तिची सून सुनिता वळवी यांना या घटनेची माहिती दिली. त्या दोघी घटनास्थळी पोहोचताच आरोपींनी पळ काढला.

जखमी अनिलला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर उपनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २११/२०२२, भा.द.वि. कलम ३०७ (खुनी हल्ला), ३२४, ३२३, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक देविदास सोनवणे यांनी तातडीने दोन्ही आरोपींना अटक करून अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने तपास केला आणि मुदतीत मा. जिल्हा सत्र न्यायालय, नंदुरबार येथे दोषारोपपत्र दाखल केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश के. आर. पेठकर यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी झाली. सरकार पक्षाने सादर केलेले साक्षीदार, पंच आणि तपास अधिकारी यांच्या महत्त्वाच्या साक्ष न्यायालयासमोर सिद्ध झाल्या. सबळ पुराव्यांच्या आधारे, न्यायालयाने आरोपी हरीष नेहरु वळवी (वय–२४) आणि दिनेश केशवंत वसावे (वय–२५) यांना भा.द.वि. कलम ३०७ व ३४ अन्वये दोषी ठरवले.

न्यायालयाने दोघांनाही प्रत्येकी ७ वर्षांचा सश्रम कारावास आणि रुपये ५,०००/– दंडाची शिक्षा ठोठावली आहे.सरकारी पक्षाचे वतीने अति. सरकारी अभियोक्ता अॅड. महेश पाडवी यांनी कामकाज पाहिले. पोलीस उपनिरीक्षक हेमंत मोहिते, पोहेकॉ नितीन साबळे, पोहेकॉ/राजेंद्र गावीत, पोहेकॉ/शैलेंद्र जाधव यांनी पैरवी अंमलदार म्हणून सहकार्य केले. तपास अधिकारी आणि अभियोक्ता यांचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन व जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी यांनी अभिनंदन केले आहे.

# युवा क्रांती नंदुरबार व आदिवासी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रायसिंग मामा यांचा सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी ।**

खानदेशातील सोंगाड्या कलेचा तेजस्वी वारसा जपणारे सुप्रसिद्ध कलावंत रायसिंग हिरा पाडवी (रायसिंग मामा) यांना महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘ज्येष्ठ कलावंत पुरस्कार’ जाहीर झाला असून, हा मान मिळवणारे ते खानदेशातील पहिलेच कलावंत ठरले आहेत. या यशानंतर युवा क्रांती नंदुरबार आणि आदिवासी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा सत्कार करण्यात आला. राज्यातील एकूण २४ ज्येष्ठ कलावंतांची या वर्षी पुरस्कारासाठी निवड झाली होती, त्यात रायसिंग मामा यांची निवड ही संपूर्ण आदिवासी समाज आणि खानदेशासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. मुंबईतील रविंद्र नाट्यमंदिरात संपन्न झालेल्या पुरस्कार सोहळ्यात राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते रायसिंग मामा यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि धनादेश प्रदान करण्यात आला.

रायसिंग मामा पाडवी यांचा जन्म सन १९५९ मध्ये सोनारे दिगर (ता. नवापूर) येथे झाला. त्यांनी १९७३–७४ च्या सुमारास सहकाऱ्यांसह



‘रायसिंगमामा सोनारेकर सोंगाड्या पार्टी’ ची स्थापना केली. त्यांच्या टीममध्ये मधुकर वसावे, सुरेश बोट्या पाडवी, जेरमा गावित, ओजा वसावे, स्त्री–पात्र करणारे रमेश कर्मा पाडवी, रतिलाल वसावे तसेच पेटीवादक मधूकर गावित आणि तबला वादक फुलसिंग गावित यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या विनोदी अदाकारीची जादू पाहण्यासाठी आजही प्रचंड गर्दी होत असून मामांनी सोंगाड्या कलेला नवी उंची दिली आहे.नंदुरबार येथे आयोजित सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी रायसिंग मामा यांना शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले. या कार्यक्रमास युवा क्रांतीचे प्रदेशाध्यक्ष अॅड. रुपसिंग वसावे, अॅड. संग्रामसिंग पाडवी, अॅड. जितेंद्र वसावे, अॅड. रूपसिंग तडवी, अॅड. लक्ष्मण पाडवी, अॅड. संदीप वसावे तसेच आदिवासी वकील संघाचे इतर वरिष्ठ सदस्य उपस्थित होते. रायसिंग मामा यांचा मिळालेला हा सन्मान संपूर्ण खानदेश आणि आदिवासी समाजासाठी अभिमानाचा क्षण ठरला असून त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या सोंगाड्या कलेने पुढील पिढ्यांसाठी प्रेरणा ठरत राहावी, अशी भावना या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

# शारदा इंग्लिश स्कूल केजच्या चार विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर, सहा विभाग स्तरावर तर तीन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरा वर निवड

## शारदा इंग्लिश स्कूल केजची शैक्षणिक गुणवत्तेबरोबर प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी क्रीडा क्षेत्रातही उत्तुंग भरारी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेने विविध क्षेत्रात वारंवार आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. शैक्षणिक क्षेत्रात तर शाळेने राज्यभरातआपला नावलौकिक व वेगळा ठसा उमटवला आहे. शाळेत होणाऱ्या विविध उपक्रमामुळे शाळेतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे.शैक्षणिक क्षेत्रा बरोबरच क्रीडा क्षेत्रातही शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी राज्यस्तर, विभाग स्तर व जिल्हा स्तर या ठिकाणी आपली चमक दाखवलेली आहे.

चालू वर्षी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन क्रीडा विभागातर्फे आयोजित विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला होता.यामध्ये शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात यश संपादन केले आहे.राज्यस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यां मध्ये आयुषी विजय हिरवे सायकल रोड रेस दहा किलोमीटर,राजवर्धन किरण ओव्हाळ १४ वर्षे वयोगट दहा किलोमीटर, ट्रायल सायकल रेस, सिद्धार्थ चौधरी स्क्वॅश खेळ प्रकारात पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे तर विभाग स्तरावर वैष्णवी बडे,संयुजा थोरात,रोहित चौधरी यांची चेस स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. तसेच स्केटिंग मध्ये समर्थ मुळे याची विभाग स्तरा वर निवड झाली आहे.

कराटे स्पर्धेतही शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपला दमखम दाखवला असून अश्विनी ढिकले,चाळक चैतन्य यांचीही विभाग स्तरावर निवड झालेली आहे तर क्रिकेट संघाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरा वर आपली निवड करून आपली गुणवत्ता सिद्ध करून




दाखवलेली आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांनी व शाळेतील क्रीडा शिक्षक यांनी घेतलेल्या प्रचंड मेहनतीमुळे हे संपादन केले आहे.शाळेच्या प्रचंड उत्साही असलेल्या क्रीडा शिक्षिका श्रीमती वर्षा दिक्खत,श्री.सोळंके बालाजी सर,श्री.ठोंबरे अनिल सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.शाळेच्या विद्यार्थ्यांनी केलेली प्रचंड मेहनत व मिळवलेले यश यांचा सन्मान शाळेच्या व संस्थेच्या वतीने शाळेमध्ये करण्यात आला.याच बरोबर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक यांचाही सन्मान करण्यात आला. सदरील कार्यक्रमासाठी शाळेच्या मार्गदर्शिका तथा संचालिका सौ.अर्चनाताई आडसकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.याप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले शारदा इंग्लिश स्कूल केज शाळे तील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवण्या साठी लागणाऱ्या सर्व सुविधेची कसल्याही प्रकारची कमतरता पडू देणार नाही हे सांगताना त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य डॉ.मिश्रा एस.एम,उप प्राचार्य सुरज सनी,श्री. देशमुख पी.एम व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.


# परळीत १३ डिसेंबर रोजी मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन

## शहरातील आंबेडकरी प्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

परळी बुद्धभूमी चारिटेबल ट्रस्ट आयोजित व प्रकाश वाघ निर्मित मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाचे परळी वैजनाथ शहरात आयोजन करण्यात आले आहे.या नाट्यप्रयोगास शहरातील बहुजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निर्माते प्रकाश वाघ यांनी केले आहे. सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे या रमाईच्या भुमिकेत आहेत.

परळी वैजनात शहरात दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५:०० वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात या प्रयोगाचे सादरीकरण होणार आहे. परळी शहरातील व ग्रामीण भागातील लोकांनी परिसरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी विनंती आहे की आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी.



या नाटकाचे दिग्दर्शक=प्राध्यापक रमाकांत भालेराव सर आहेत. लेखिका व रमाबाई आंबेडकर यांच्या मुख्य भूमिकेत आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या आहेत. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत आम्ही जरांगे,डिलिव्हरी बॉय, प्रेमवारी, मलिका = बाळूमामाच्या नावानं चांगभलं,ज्ञानेश्वर माऊली,साता जन्माच्या गाठी,अशा अनेक मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. तसेच त्यांचे शिक्षण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनी असून त्यांनी अनेक वर्ष रमाई च्या आयुष्यावर संशोधन करुन रडणाऱ्या नाही तर लढणाऱ्या रमाईचा इतिहास सांगणारे भारतातील पहिले नाटक उभे केले आहे.

घराघरात धाडसी रमाईचा इतिहास पोहोचवणारं ही संकल्पना घेवून सध्या त्यांचा महाराष्ट्र दौरा सुरु आहे.या कार्यक्रमाला परळी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.तसेच या नाटकाचे तांत्रिक कलावंत पार्श्व संगीत =अनिल दुधाटेप्रकाश योजन,=माणिकचंद थोरात,नेपथ्य =विशाल धनंजय कहळे ,रंगभूषा = कमलाकर चव्हाण काजल चव्हाण,प्रगती गोधणे यांनी केल्या आहेत. या प्रयोगासाठी तिकीटासाठी प्रकाश वाघ मोबाईल क्रमांक ९६९९५१००४९, तसेच ९९६०५१५०५६ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भरधाव कारने दोन मोटार स्वाराला धडकले

## तिघे जखमी एकाची प्रकृती गंभीर

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज-कळंब रोडवर एका भरधाव वेगातील कारने दोन मोटार सायकल स्वारांना उडवून फरार झाला आहे. अपघात तिघे जखमी झाले असून एकाची प्रकृती गंभीर आहे.

दि. १० डिसेंबर रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास केज-कळंब रोडवर माऊली सिनेमा गृह आणि कमल पेट्रोल पंप यांच्या दरम्यान माजी सरपंच युवराज काळे यांच्या शेता जवळ कळंबच्या दिशेने जाणाऱ्या एका पांढऱ्या रंगाच्या भरधाव वेगातील स्विफ्ट कारने केज कडून कळंबच्या दिशेने जात असलेल्या विकास शिवाजी निंगुळे याच्या मोटार सायकल क्र. (एम.एच ४४/एल १६३६) ला जोरदार धडक दिली. तसेच त्याने त्या नंतर दुसऱ्या एका मोटार सायकल क्र(एम.एच ४४/ए सी ७७६०) हिलाही धडक दिली. त्या वरून प्रवास करणारे दोघे जखमी झाले



आहेत. अपघाता नंतर कार चालक पुन्हा भरधाव वेगाने पळून गेला.

अपघातातील जखमीवर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात हलविले आहे.तीन जखमी पैकी विकास निंगुळे याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालय केज येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरवसे यांनी दिली आहे. अपघातातील इतर दोन जखमींची नावे अद्याप समजलेली नाहीत.दरम्यान अपघाची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशावरून सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरामे आणि पोलिस कॉन्स्टेबल सिद्दिक शहा हे अपघातस्थळी हजर झाले.

# चौदा वर्षीय वयोगटातील सॉफ्टबॉल शालेय क्रीडा स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालय केज मुलींचा संघ राज्यस्तरा साठी पात्र



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.९ डिसेंबर २०२५ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने जिल्हाक्रीडा संकुल बीड येथे शालेय सॉफ्टबॉल १४वर्ष वयोगट विभागीय स्पर्धा दिनांक ९ डिसेंबर २०२५रोजी क्रीडा संकुल बीड येथे संपन्न झाल्या.यात बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालयाचा १४ वर्ष मुलांचा व मुलींचा संघ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत सहभागी झालेला होता.या स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरा साठी पात्र झाला आहे. तसेच मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.या संघास क्रीडा मार्गदर्शिका तथा प्राचार्य डॉ.कविता गीते मॅडम,क्रीडा शिक्षक सानप सर,कांदे मॅडम, घुले सर,साखरे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते. तसेच माजी विद्यार्थी केशव कराड व सीनियर खेळाडू कृष्णा गिते या विद्यार्थ्यांनी नियमित सराव घेऊन विद्यार्थ्यांना राज्यस्तरांपर्यंत पोंहोचण्यास मदत केलेली आहे.या विद्यार्थ्यांचे बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर,दिनकर थोरात सर,रेवन्नाथ शेलार सर,सतीश राठोड सर अनिकेत काळे सर, होसुरकर सर,संस्था अध्यक्ष ड.उद्धवराव कराड साहेब,कापसे सर सर्व शिक्षक इतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेत शुभेच्छा दिल्या आहेत.

# लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांची जयंती शिक्षक कॉलनीत उत्साहात पण साधेपणाने साजरी होणार!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बहुजन समाजासाठी आणि उपेक्षित वंचितांसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे आणि महाराष्ट्रात असंख्य राजकीय कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण करणारे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांची जयंती शिक्षक कॉलनी, केज येथे साध्या पद्धतीने पण उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात येणार आहे.

शिक्षक कॉलनी मित्र मंडळ आणि परिसरातील नागरिकांच्या वतीने ही जयंती शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिर, शिक्षक कॉलनी,केज येथे आयोजित करण्यातआली आहे.वंचित आणि बहुजन समाजाच्या उद्धारासाठी मुंडे साहेबांनी केलेल्या कार्याची आठवण ठेवत, त्यांची जयंती उत्साहात परंतु कोणत्याही प्रकारचा



अनावश्यक खर्च टाळत, साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

**उपस्थितीचे आवाहन**

या कार्यक्रमाला प्रकाश मुंडे,दत्ता धस पंत,भगवान केदार,देसाई,घुले साहेब, बाबासाहेब केदार,पिंटू भैया तांदळे,खय्युम शेख, रवि घुले,गोटू भैय्या पाळवदे,अमोल धस,प्रा. मुकुंद घुले,अमोल मुंडे, मोहसीन शेख,शशिकांत ढाकणे,अमोल घुले, रणजित घुले,संदीप भुतडा,अमर केजकर,चंदू चौरे,हनूमंत घोळवे,केशव बच्छाव,सोनू वैभव धस, वैभव केंद्रे,अमोल ठोंबरे, प्रदीप ठोंबरे,अतुल ठोंबरे, विकास मुळे,आकाश बोराडे,रवि अंधारे,मनोज मस्के,विजय अंधारे, प्रविण साबळे,रोहीत मुंडे, राजेश गवळी,राजेभाऊ मुळे,अनंत आघाव सर, महादेव जाधवर,विष्णू राख,महेश राख,दत्ता नाईकवाडे,आसद शेख, गणेश ढाकणे,बाळू थोरात भैय्या,नवनाथ घुले, नवनाथ सावंत,योगेश हांगे,रामहरी घुले सर, बापु घुले सर,डॉ.डापकर साहेब,बाबा मुंडे सर प्रशांत धस,सोहम अंधारे, विक्की घोडके,काकड सर,अंधारे सर,स्वामी साहेब,गोरक घुले,स्वप्निल घुले,नागरगोजे साहेब, रमाकांत ढाकणे,डोईफोडे वसंत फौजी,गोविंद घोळवे,वैभव डोईफोडे चिकू चौरे,ओम केदार, औदूंबर ढाकणे,शशिकांत ढाकणे,मयुर टकले,कृष्णा आकुसकर,श्रीकांत चौकीदार,चौरे मामा,पप्पू गायकवाड,गालफाडे तात्या,राजा राऊत,मनोज शिंदे,अलोक गायकवाड, प्रविण थोरात,अर्णव अंधारे,पारस थोरात,राम घुले व इतर सर्व मान्यवर तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षक कॉलनी मित्र मंडळ आणि परिवाराकडून करण्यात आले आहे.

# नंदुरबारचा अभिनव उपक्रम: आदिवासी भाषांच्या डिजिटल जतनासाठी 'भाषिनी ट्रायबल दान' यशस्वी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या मार्गदर्शनाखाली ऐतिहासिक पाऊल नंदुरबार: नंदुरबार जिल्ह्यातील समृद्ध आदिवासी भाषिक वारसा डिजिटल स्वरूपात जतन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात ९ डिसेंबर २०२५ रोजी 'भाषीनी ट्रायबल दान' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखालील या उपक्रमाने जिल्ह्याच्या भाषिक विविधतेच्या संवर्धनासाठी एक भक्कम पाया रचला आहे.





भारत सरकारने सुरू केलेल्या भाषीनी या राष्ट्रीय डिजिटल प्रकल्पांतर्गत हा 'ट्रायबल दान' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रकल्पाचा उद्देश स्थानिक भाषांना डिजिटल स्पेसमध्ये आणणे आणि ए.आय. आधारित सेवा मातृभाषेत उपलब्ध करणे हा आहे. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट हे होते की, जिल्ह्यातील तंत्रज्ञान-समज असलेल्या व्यक्तींची ओळख पटवून त्यांना त्यांचे आदिवासी भाषेतील मौल्यवान ज्ञान, शब्दकोश आणि पारंपरिक शब्दप्रयोग डिजिटल डेटाबेससाठी 'दान' करण्यास प्रोत्साहित करणे. कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या पारंपारिक गीत सादरीकरणाने झाली. उमा ठाकरे यांनी स्थानिक आदिवासी भाषेत अप्रतिम काव्य सादर केले, तर नवापूरच्या अंगणवाडी सेविकांनी पारंपरिक लोकगीत गायन करून उपस्थितांचे मन जिंकले. या सादरीकरणांनी स्थानिक मौखिक परंपरा डिजिटल स्वरूपात जतन करण्याच्या मुख्य उद्देशाला अधिक बळ दिले. भाषीनी च्या तज्ज्ञ टीममधील त्रिशा, सृष्टी आणि विशद यांनी उपस्थितांना कृत्रिम बुद्धिमत्ता कशी कार्य करते आणि आदिवासी भाषांचा डेटा डिजिटल स्वरूपात संकलित करणे का महत्त्वाचे आहे, याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. ट्रायबल दानची आवश्यकता स्पष्ट करताना, तज्ज्ञांनी सांगितले की यामुळे: लुप्त होत चाललेल्या भाषांचे वैज्ञानिक जतन होईल.,आरोग्य, शिक्षण आणि सरकारी सेवांची माहिती प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या स्वतःच्या भाषेत उपलब्ध होईल. ए आय ऑटो-ट्रान्सलेशनमुळे शासकीय माहिती आणि व्हिडिओ एका क्लिकमध्ये स्थानिक भाषेत उपलब्ध होतील. या महत्त्वपूर्ण प्रकल्पात शिक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी, फ्रंटलाइन आरोग्य कर्मचारी, ग्रामपंचायत प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक आणि गृहिणींसह विविध आदिवासी भाषिक समुदायांच्या ८० हून अधिक सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांनी आपली बोली, शब्दसंपदा, वाक्यरचना आणि उच्चार पद्धतीचा डेटा उपलब्ध करून दिला. निती आयोग फिलो क्षितिजा देशमुख यांनी कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन केले. हा उपक्रम सांस्कृतिक, शैक्षणिक आणि डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने नंदुरबारसाठी एक ऐतिहासिक पाऊल ठरला असून, यामुळे भविष्यात आदिवासी भाषांमध्ये ए आय-आधारित सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या ७६ व्या जयंती निमित्त स्वामी विवेकानंद शाळे मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज याशाळेमध्ये स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि.१२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी सकाळी ठीक ९ ते २ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.सदरील रक्तदान शिबिराचे हे ३१ वे वर्ष आहे.यारक्तदान शिबिराचे काम केज येथील डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच त्यांची टीम पाहणार आहे. तरी बहुसंख्य रक्तदात्यांनी या रक्तदान चळवळीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ केज तसेच



स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक व माध्यमिक विभाग,केज, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज तसेच स्व. प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सातबाऱ्याचा कापूस पिकपेराअडसर दूर करा शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने त्वरित खरेदी करा!

## होटाळकरांच उपमुख्यमंत्र्यांना साकडे, येत्या काही दिवसात केंद्रीय कृषी मंत्र्याची भेट घेणार

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हानुमंत चंदनकर**

अतिवृष्टी, वादळे, नैसर्गिक संकटांचा सगळा तडाखा सोसून शेतकऱ्यांनी जगण्यासाठी कापसाची लागवड केली. शेतात कापूस पांढऱ्या सोन्यासारखा डौलाने उभा राहिला, पण महसूल दप्तरी मात्र अजूनही 'सोयाबीन'! याच जाचक अटीनं बळीराजाला हमीभावाच्या दारात अडवलं आहे. हा अन्याय संपवण्यासाठी सातबाऱ्यावरची पेरा नोंद शिथिल करा व कापूस खरेदी तात्काळ सुरू करा, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी नागपूर अधिवेशनात असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. हा प्रश्न निकाली नाही निघाल्यास थोड्याच दिवसात केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांची भेट घेणार असे ही त्यांनी सांगितले....

होटाळकरांनी निवेदनात स्पष्ट केलं की, जिल्ह्यातील हजारो शेतकरी प्रत्यक्षात कापूस पिकवतातय; पण सातबाऱ्यावर जुनी सोयाबीन पेरा नोंद राहिल्यानं सी.सी.आय. खरेदी केंद्रांवर त्यांचा कापूस स्वीकारला जात नाही. परिणामी शेतकऱ्यांना खासगी बाजारात प्रति क्विंटल तब्बल १,२०० रुपयांचे नुकसान सहन करावं लागत आहे.

**शेतकऱ्यांचा एकही क्विंटल कापूस घरी राहू देणार नाही! – होटाळकरांची ठाम भूमिका**

नायगाव येथील माझ्या भारत कॉटन ॲग्रो बाजार समिती व जिनिंगवर शेतकरी मोठ्या प्रमाणात कापूस घेऊन येत आहेत. पण सातबाऱ्यावरील चुकीच्या नोंदीमुळे हमीभावापासून त्यांना लाटण्यासारखे हाकलले जात आहे. ही परिस्थिती भयावह असून, जिल्ह्यातील एकाही शेतकऱ्याचा कापूस खरेदी शिवाय राहू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी




दिल्याचे होटाळकरांनी सांगितले.

**शेतकऱ्यांच्या मनात संताप**

आमचं पीक शेतात उभं, की सातबाऱ्यावर?** अतिवृष्टीने पीक उध्वस्त झालं. जीव वाचवण्यासाठी कापसाची लागवड केली. पण सातबाऱ्यावर सोयाबीनचीच नोंद असल्याने खरेदी केंद्रावर 'नकार'! यामुळे शेतकऱ्यांचा आक्रोश शेतात कापूस डौलाने उभा आहे, पण प्रशासन सांगतं 'तुझ्या सातबाऱ्यावर तर सोयाबीन आहे!' मग पीक आम्ही पेरतो की महसूल खाते?

**निवडणुकीत घरात येणारे नेते, सातबारा दुरुस्तीसाठी कुठे गायब?**

शेतकऱ्यांनी जळजळीत सवाल केला – मतांच्या वेळेस दारात येणारे पुढारी आमच्या सातबाऱ्याची चूक दुरुस्त करायला पुढे का येत नाहीत?

**सातबाऱ्याचा डिजिटल अडसर; शेतकऱ्यांची जीवन–मरणाची लढाई**

शेतात सोन्यासारखा कापूस तयार झाला आहे. पण सरकारी अटींच्या कागदी कोंडीत अडकून शेतकरी रस्त्यावर आले आहेत. सातबाऱ्यावरचा चुकीचा 'सोयाबीन पेरा' शेतकऱ्यांच्या जगण्याचा गळा आवळतोय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**शेतकऱ्यांची एकमुखी मागणी**

अट शिथिल करा, कापूस खरेदी सुरू करा!** जिल्ह्यातील शेतकरी प्रशासनापुढे ठामपणे उभे – असून ही जाचक अट रद्द करून शेतकऱ्याचा घरात पडून असलेला कापूस खरेदी करावा या साठी अटी शिथिल कराव्यात सातबाऱ्यावरची अट हटवा, आणि आमचा कापूस त्वरित हमीभावाने खरेदी करा! असा टाहो शेतकरी सर्वत्र करीत असताना नायगाव मतदार संघाचे आमदार मात्र विकास कामाचे श्रेय घेण्यात मग्न असल्याची चर्चा आहे.

# गोदावरीत मध्यरात्री विस्फोटक धडक!

## बरबडा वाडी शिवारात अवैध रेती उपसा करणाऱ्यांचे ३३ लाखांचे बेकायदा साम्राज्य उडाले हवेत

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड । हनुमंत चंदनकर**

गोदावरीचे पात्र काळोखात शांत असले तरी त्याच अंधारात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचा धंदा चालू होता. पण सोमवारी मध्यरात्री मंगळवारी पहाटे प्रशासनाने अचानक 'हल्ला' चढवत वाळू माफियाच्या छाताडावरच घाव घातला. मौजे बरबडा येथे रात्री साडेअकराच्या सुमारास सुरू असलेला अवैध वाळू उपसा 'इन ॲक्शन' पकडत प्रशासनाने दोन प्रचंड बोटी व एक इंजिन ताब्यात घेतले आणि पहाटे तीनच्या सुमारास जिलेटीनने उडवून पूर्ण नष्ट केले.तब्बल ३३ लाखांच्या अवैध बोटी व इंजिनाचा धुडकाव प्रशासनाच्या या तडाख्यामुळे माफियांमध्ये अक्षरशः धडकी भरली आहे. तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी 'पुढारी'शी बोलताना ही माहिती दिली.



**रात्रीचा कमांडो–स्टाईल ऑपरेशन!**

अवैध वाळू उपसा सुरू असल्याची पक्की खबर मिळताच उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रीच पथक तयार करण्यात आले. अंधारात नदीपात्रात धाड टाकतानाच अवैध बोटी व इंजिन दिसताच अधिकारी सरळ पाण्यात उतरले. बोटी सील करून पहाटे जिलेटीनच्या सहाय्याने त्या उडवून खाक करण्यात आल्या. पाण्यावर तरंगणारे लोखंड क्षणात हवेत विरले आणि बरबड्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचा दम ठोकून दिला!

**धडक कारवाईत 'ही' टीम होती हजर**

या कारवाईत उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे,यांच्या मार्गदर्शना खाली, तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड, मंडळ अधिकारी अरविंद कावळे, रोहित पवार, सचिन आरु, ग्राम महसूल अधिकारी श्याम मुंडे, सुनिल हसनपल्ले, शुभम पाटील, संदीप पवार, परमेश्वर कार्लेकर, चंद्रमय कदम, जयंत तुडमे, गजानन देशमुख, गोविंद काळे, ड्रायव्हर तुकाराम पुरी, कोतवाल अनिल जाधव, बापुराव तिजारे, शंकर खनपटे, बालाप्रसाद बिस्मिल्ले , कुंटूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल भोसले साहेब त्यांची कर्मचारी अशी मजबूत टीम उपस्थित होती.

**वाळू माफियाची झोप उडाली!**

अवैध वाळू उपसासाठी वापरली जाणारी महागडी यंत्रणा क्षणात उडवून नष्ट केल्याने वाळू माफियामध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे. नदीकाठच्या गावांत एका रात्रीत केलेल्या या धडक कारवाईची चर्चा तुफान रंगली आहे. प्रशासन आता या साखळीतील मोठ्या माशांवरही कारवाई करण्यास सज्ज असल्याचे संकेत मिळत आहेत.

# वाघे बाभुळगाव शिवारा तील दुर्घटना,पत्नीला वाचविताना पतीचा ही विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यू

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील वाघे बाभुळगाव शिवारात विहिरीतून पाणीकाढताना पाय घसरून विहिरीत पडलेल्या पत्नीला वाचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीचाही,पत्नी सह विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली.

वाघेबाभुळगाव शेजारीच असलेल्या पवारवाडी येथे शेतकरी भास्कर विनायक पवार,पत्नी अल्का पवार व मुलगा ऋषिकेश हे तिघे ही वाघे बाभूळगाव शिवारातील शेतात खुरपणी करीत होते. सायंकाळी साडेचार वाजण्याच्या दरम्यान अल्का पवार या पिण्या साठी विहिरीतून पाणी काढत असताना त्यांचा पाय घसरून त्या विहिरीत पडल्या.त्यांना वाचविण्या साठी त्यांचे पती भास्कर पवार यांनीही विहिरीत उडी मारून पत्नीला वाचविण्याचा प्रयत्न



केला.मात्र अल्का पवार वय ४० वर्षे व भास्कर पवार वय ४५ वर्षे या दोघा पती,पत्नीचा ही विहिरीच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला.त्यांचे मृतदेह विहिरीतून बाहेर काढून नांदूरघाट येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.मयताचा भाऊ सुग्रीव शंकर पवार यांच्या खबरेवरून केज पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उप निरीक्षक अशोक सोनवणे हे करीत आहेत.

# विद्यार्थ्यांनी जीवनात परिश्रम, शिस्त व नैतिक मुल्यांची जपणूक करावी–प्राचार्य विलास पाटील

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात परिश्रमा सोबत शिस्त आणि नैतिक मूल्यांना महत्व दिले तर आयुष्य सुखकर, व वैभवशाली होऊन यशाचे परमोच्च शिखर गाठल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी जीवन जगत असतांना नैतिक मुल्यांना महत्व द्यावे असे प्रतिपादन प्राचार्य विलास पाटील यांनी केले.

अक्कलकुवा येथे जवाहर नवोदय विद्यालयात 'माजी विद्यार्थ्यांचा मेळावा' अत्यंत उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन नवोदय विद्यालयाचे प्राचार्य विलास पाटील बोलत होते. मेळाव्याचे प्रास्ताविक विद्यालयाचे मराठी विषयाचे शिक्षक संजय पाचोरे यांनी केले. त्यांनी मेळाव्याच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.



याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. ज्ञानेश्वर पाटील, डॉ. महेंद्र बोरसे, अनिल नाईक, प्रशांत जाधव, ज्ञानेश्वर कोळी, विकास पाटील, वसंत तडवी, सुदाम वळवी आदींनी मनोगत व्यक्त करत आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. त्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तप्रिय जीवनशैली आणि ध्येयपूर्तीसाठी चिकाटीने प्रयत्न करण्याचा संदेश दिला.

तर संगीत शिक्षक अविनाश तळणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नाटिका सादर केली. विद्यालयाची विद्यार्थिनी प्रारब्धा पाटील हिने सादर केलेली देखणी लावणी उपस्थितांची विशेष दाद मिळवून गेली व कार्यक्रमात सांस्कृतिक रंग भरले. मेळाव्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रामेश्वर वाढेकर यांनी केले. माजी विद्यार्थी, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये झालेला स्नेहसंवाद स्नेह भोजन यामुळे संपूर्ण वातावरण प्रेरणादायी व भावपूर्ण बनले. यावेळी व्हॉलीबॉलचा मैत्री पुर्ण सामना झाला. या वेळी मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी, नवोदय विद्यालयाचे शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी या मेळाव्याचे भरभरून कौतुक करत तो शाळेच्या गौरवशाली परंपरेचा अविभाज्य भाग ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

# मराठवाडा रेल्वे विकासाला मिळणार गती,आमदार नमिता मुंदडांच्या प्रयत्नांना यश,अंबाजोगाईसाठी तीन महत्त्वाच्या प्रकल्पांना लवकरच हिरवा कंदील

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

अंबाजोगाई रेल्वे विकासाला लवकरच गती मिळणार आहे. आमदार नमिता मुंदडांच्या प्रयत्नांना यश येणार आहे.जनागृह अंबाजोगाई रेल्वे विकास समितीच्या वतीने करण्यात आलेल्या तीन महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांच्या मागण्यांना लवकरच गती मिळण्याची चिन्हे आहेत.आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्यामार्फत या प्रकल्पां साठी पाठपुरावाकरण्यात आला असून,यामुळे अंबाजोगाईसह संपूर्ण मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.




**प्रस्तावित तीन महत्त्वपूर्ण रेल्वे मार्ग**

**घाटनांदूर –अंबाजोगाई– श्रीगोंदा (दौंड) मार्ग**

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला थेट जोडणारा हा मार्ग व्यापार,शिक्षण आणि रोजगारासाठी महत्त्वाचा दुवा ठरेल.दौंड जंक्शनमार्फत महाराष्ट्र व दक्षिण भारताशी थेट कनेक्टिव्हिटी मिळेल.

**सोलापूर –अंबाजोगाई – हिंगोली मार्ग**

तुळजापूर,परळी वैद्यनाथ, औंढा नागनाथ यांसारखी महत्त्वाची तीर्थस्थळे जोडली जाऊन धार्मिक पर्यटन,औद्योगिक वाढ आणि प्रवासी वाहतुकीस मोठा लाभ होईल.

**परळी –अंबाजोगाई – पंढरपूर मार्ग**

पंढरपूर भक्तांसाठी सोयीस्कर रेल्वे सेवा उपलब्ध होईल.तसेच, बार्शी मार्फत सोलापूर–बेळगाव पट्ट्याशी कनेक्टिव्हिटी वाढेल. या प्रकल्पांमुळे अंबाजोगाई परिसरातील जनतेच्या प्रवासासाठी नवी सुविधा उपलब्ध होणार असून,तिन्ही मार्गांमुळे रेल्वे कनेक्टिव्हिटीचे जाळे अधिक सक्षम होणार आहे.

# ॲड.सतीश देशमुख यांना पितृशोक, बालासाहेब देशमुख यांचे दु:खद निधन

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

शहरातील गणेशपार भागातील देशमुख गल्ली येथील रहिवासी तथा नगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी कै. बालासाहेब गंगाधरराव देशमुख यांचे दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ८:१५ वाजता वार्धक्याने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८१ वर्ष होते.



या दुःखद घटनेची अधिक माहिती अशी की, गाव भागातील देशमुख गल्ली येथील रहिवाशी तथा सर्व सुपरिचित व्यक्तिमत्व असणारे नगरपालिकेचे माजी कर्मचारी कै. बालासाहेब गंगाधरराव देशमुख यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी वार्धक्याने दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८१ वर्ष होते. कै. बालासाहेब देशमुख हे जुन्या पिढीतील अत्यंत मनमिळावू, सुस्वभावी तथा धार्मिक वृत्तीचे सर्वांसोबत स्नेहबंध जपणारे व्यक्तिमत्त्व होते. नगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी असणारे बालासाहेब देशमुख अतिशय शिस्तप्रिय तथा प्रामाणिक वृत्तीचे मानले जात. त्यांच्या पश्चात १ बहीण, ३ मुले, सुना, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. येथील प्रसिद्ध विधीज्ञ ड. सतीश देशमुख यांचे ते वडील होत. बालासाहेब देशमुख यांच्या पार्थिवावर दिनांक ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ : ३० वाजता वैद्यनाथ मंदिर च्या पाठीमागे सार्वजनिक स्मशानभूमी या ठिकाणी अंतिम संस्कार करण्यात येतील. अंत्ययात्रा देशमुख गल्ली राहते घर येथुन सकाळी ११ : ३० वाजता निघेल. देशमुख परिवारावरती कोसळलेल्या दुःखात दैनिक वादळ वार्ता परिवार सहभागी आहे.

# कढेल–गुंजाळी शाळांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

१० डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कढेल येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गुंजाळी यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे सहावे पुष्प उत्साहात गुंफले गेले. या परिषदेत गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव, केंद्रप्रमुख युवराज मराठे यांच्यासह मोड केंद्र अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांतील शिक्षकांनी सहभाग घेतला. 'सकारात्मक शिस्त' या विषयावर जिल्हा परिषद शाळा कढेल येथील माजी विद्यार्थिनी अनुष्का गिरासे हिने एक सुंदर रांगोळी साकारली



होती. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते कसे असावे, या संदर्भातील भावना तिने या कलाकृतीतून अचूकपणे मांडल्या. तिच्या या कौतुकास्पद कार्याबद्दल विस्तार अधिकारी वसंत जाधव यांनी तिचे अभिनंदन केले. गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर यांनी शाळेच्या स्वच्छ आणि सुंदर परिसराचे कौतुक केले. शिक्षक आणि गावकरी यांच्या एकोप्यामुळेच हे साध्य होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. शाळेमध्ये स्वयंस्फूर्तीने विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या प्रेरिका छाया वळवी यांचा परिषदेत सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी गुंजाळी शाळेचे मुख्याध्यापक व्हरगळ सर, राहुल शितोळे, शा.व्य.स. अध्यक्ष सुपड्या पाडवी, कढेल येथील सरपंच अश्विनी वळवी, शिक्षिका अर्चना वळवी, व्यवस्थापन समिती अध्यक्ष मोग्या मोवाशी, अमृत मोवाशी, नवनाथ वळवी, योगेश पाडवी, गणेश ठाकरे यांचे सहकार्य लाभले. कढेल शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077